विशेष दरखास्त क्र.३९/२०१९
संग्राम वि. शासन

**<u>नि.क्र. १ खालील आदेश</u>**

**०१.** सदर दरखास्त दि.१५/०३/२०१९ रोजी दाखल केली असून त्यामध्ये जाबदार हजर झाले आहेत. त्यांनी आपले म्हणणे सादर केले आहे.

**०२.** धनको यांनी नि.क्र.११ लगत पुरसीस देवून मा.उच्च न्यायालयात पहिले अपील क्र.२०८०/२०१९ मध्ये मा. न्यायालयाने स्थगिती दिल्याबद्दल कथन केले आहे. त्यासोबत, मा. उच्च न्यायालयाच्या वेबसाईटचा उतारा दाखल केला आहे. सदर उताऱ्यात अपील खारीज केले असल्याबद्दल उल्लेख आहे.

**०३.** मा. उच्च न्यायालयाच्या स्थगितीबद्दल सद्यस्थितीची परिस्थिती न्यायालयात दाखल करण्यासाठी दि.१८/१२/२०२४ रोजी अर्ज देवून मुदत मागण्यात आली. मात्र, आजअखेर कोणतेही आदेश सादर केलेले नाहीत. ना. उच्च न्यायालयाचे कोणतेही रिट याकामी दाखल झालेले नाही.

**०४.** अर्जदार व त्यांचे वकील यांना पुकारले असता ते गैरहजर आहेत. त्यामुळे, सदरकामी नेमलेल्या तारखेस अर्जदार समक्ष हजर राहून त्याने मा.उच्च न्यायालयापुढील अपीलाची परिस्थिती व त्यातील आदेश जर या न्यायालयात दाखल केले नाहीत तर सदर दरखास्त अंतीमत: निकाली झाल्याचे समजण्याचे आहे.

**०५.** वर नमुद परिच्छेद क्र.४ हा जशाच्या तसा रोजनाम्यामध्ये लिहिण्यात यावा, जेणेकरून पक्षकार व वकिलांना सदरचा रोजनामा ऑनलाईन उपलब्ध असल्याने आदेशाबद्दल समज मिळेल.

स्वाक्षरीत/-

**दिनांक २३/०९/२०२५.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**